

# वटपौर्णिमा

आपल्या मुलीला जर ज्येष्ठ दीर असेल तर ज्येष्ठ प्रतिपदेपूर्वी २/३ दिवस तिला माहेरी आणावे. मुलीची पाठवणी करतांना आईने तिची ओटी भरावी व तिला हौसेने काहितरी वस्तू द्यावी.

ज्येष्ठ महिन्यामध्ये ज्येष्ठ-पौर्णिमा किंवा वटपौर्णिमा हे व्रत नवविवाहितेने करावयाचे असते. या दिवशी सावित्रीने आपल्या पतीसाठी वटवृक्षाखाली बसून तपश्चर्या केली होती. म्हणूनच सुवासिनी वटवृक्षाची पूजा करतात. या दिवशी सुनेला साडी द्यावी. हिरवा चुडा भरावा. पहिल्या वर्षी वडव्रत पुजावयाचे असते. वटसावित्रीचा उपासही करावयाचा असतो.

एका ताटामध्ये वडाच्या पूजेसाठी पंचामृती पूजेची तयारी करावी.
पंचामृती पूजा :- हळदकुंकू, सुटे पैसे, सुपारी ६-७, १ नारळ, १० विड्याची पाने, अत्तर, वाटली, गुलाबपाणी, अक्षता, फुले, फणी, उदबत्ती, कापूर, पळी भांडे.

वड-व्रतेही पाच माहेरची व पाच सासरची अशी दहा पुजावयाची असतात. छोट्या सुपामध्ये कापड-नारळ, पैसे, सुपारी-विडे हे सर्व तयार करावे. एका केळीच्या पानावर आंबा, फणस-गरे, जांभूळ द्यावी. ही सर्व वाणे देवळामध्ये वडाच्या पूजेसाठी घेऊन जावे. वडाची पूजा करावी. नंतर गुरुजींना दक्षिणा व वाण द्यावे.

हे वटसावित्रीचे व्रत तीन दिवसांचे असते. पौर्णिमेच्या आधी एक दिवस हे व्रत सुरु होते. तीनही दिवस उपास करुन झाल्यावर कुमारी कहाणी वाचावयाची असते. व नंतर सुवासिनींची खणा-नारळाने ओटी भरावी. अशा तऱ्हेने या व्रताची सांगता करावी.



अनघा आपटे
सोबा पार्क
C/73
mb-9146398897